॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (002462) 215572

**OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION**

website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र./परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८९१२ दिनांक १४/०५/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य,
पदवी विज्ञान अभ्यासक्रमाचे (तक्ता-ब मध्ये समाविष्ट असलेले)
महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: उन्हाळी-२०२६ च्या बी.एस्सी. पदवी विज्ञान अभ्यासक्रमाच्या (तक्ता-ब मध्ये समाविष्ट असलेले) प्रात्यक्षिक परीक्षेत अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या संधी बाबत.

संदर्भ : (१) उन्हाळी परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८८६३, दिनांक २४/०४/२०२६ प्रात्यक्षिक परीक्षेचे परिपत्रक.
(२) दिनांक ०७/०५/२०२६ रोजीच्या मा.प्र-कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या प्रात्यिक्षक परीक्षा संबंधाने आयोजीत केलेल्या बैठकीतील ठराव.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ च्या पदवी विज्ञान अभ्यासक्रमाच्या "तक्ता-ब" मध्ये समाविष्ट असलेली अशी महाविद्यालये जेथे प्रात्यक्षिक परीक्षेच्या संबंधाने सोईसुविधा उपलब्ध नाहीत अशा महाविद्यालयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठाने नेमून दिलेल्या केंद्रावर व ज्या महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिक सोईसुविधा उपलब्ध करून घेतलेल्या आहेत अशा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २५ एप्रिल २०२६ ते दिनांक ५ मे २०२६ या कालावधीत घेण्याबाबत दिनांक २४/०४/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि, उपरोक्त प्रात्यक्षिक परीक्षेत बरेच विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेवून सदर प्रात्यक्षिक परीक्षेत अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देण्याची एक अतिरिक्त (**Additional Practical Exam.**) संधी देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

या संदर्भाने "तक्ता-ब" मध्ये समाविष्ट असलेल्या सर्वच पदवी विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की ज्या महाविद्यालयांत सोईसुविधांच्या अभावी विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक पूर्ण करून घेतले नाहीत व विद्यार्थी अनुत्तीर्ण झाली आहेत अशा महाविद्यालयांनी प्रात्यक्षिकासाठी लागणा-या सोईसुविधा तातडीने तयार करून विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करून घ्यावीत जेणे करून प्रात्यक्षिक परीक्षेतील अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एक अतिरिक्त (**Additional Practical Exam.**) संधी देण्याचे नियोजन करण्यात येईल.

उपरोक्त संदर्भाने "तक्ता-ब" मध्ये समाविष्ट असलेल्या सर्वच महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक दिनांक १५/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अधिसभा सभागृह (**Senate Hall**), येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस महाविद्यालयास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ